# " शिल्पकार "

उन्हाळा नुकताच सुरू झाला होता. सकाळी १० वाजता डोक्याला पांढरा गमशा गुंडाळून हेडगुरुजी झपाझप शाळेकडे चालले होते. वार्षिक परीक्षेचे नियोजन करण्यासाठी त्यांनी आज सहाय्यक शिक्षकांची मिटींग बोलवली होती. प्रत्येकाला कामाची विभागणी करुन द्यायची, वेळापत्रक बनवायचे हे तर दरवर्षीचेच काम असते. शाळेचे पर्यवेक्षक नामजोशी गुरुजी ही जबाबदारी व्यवस्थित पार पाडायचे. पण यावेळेस ते महीनाभर सुट्टीवर होते. त्यांच्या पायाला प्लास्टर लागले होते. आता दुसऱ्या कोणत्या तरी जबाबदार व्यक्तीवर हे काम सोपवावे लागेल, काम नवीन असल्यामुळे त्यांना नीट समजावून द्यावे लागणार होते; अशाच विचारांच्या तंद्रीत गुरुजी शाळेत येवून पोहचले देखिल !!

बाबुराव शिपायाने त्यांच्या हातातील बॅग घेतली आणि सगळे शिक्षक आल्याची माहीती दिली.

पुळगावमधे ही शाळा 'लोकांची शाळा' या नावाने दहा वर्षापूर्वी स्थापन झाली होती. एक एक इयत्ता वाढत वाढत या वर्षी पहिल्यांदा दहावीची पहीली बॅच परीक्षेला बसणार होती. एकीकडे आनंद तर दुसरीकडे सगळं नीट होणार ना ?? काही अडचणी आल्या तर ?? अशी हुरहुरही वाटत होती. शिक्षक वर्गात नसतांना वर्ग सांभाळण्याची जबाबदारी प्रत्येक इयत्तेतील वर्गनायकाची असते; शिक्षकांनी ते येईपर्यंत विद्यार्थ्यांनी काय काय करायचे ते आपापल्या वर्गातील वर्गनायकांना सांगितले.

वर्ग एक मधे शिकणारा नरेंद्र हा अभ्यासाकडे दुर्लक्ष करुन वर्गात अशांतता कशी पसरेल यासाठी नेहमीच अनेक कुरापती काढीत असे; त्याच्या खोड्या मित्रांपुरत्याच मर्यादित नव्हत्या तर कधी कधी शिक्षकांनाही तो जेरीस आणायचा. त्यामुळे सगळे मुलं भिवून त्याच्यापासून लांबच राहत.

AIT Global India Pvt. Ltd.
Aspire Intend Transform

आज तर काय त्याला चांगलीच संधी मिळाली होती. त्याने ठरवले की; गणिताचे खरे गुरुजी वर्गात नेहमी त्याला गृहपाठ न केल्याबद्दल रागवायचे. फळ्यावर गणित सोडवायला सांगायचे. आले नाही तर तेच गणित समजावून सांगून त्याला वहीत १० वेळा करायला लावायचे; इतर मुलांना मात्र खरे गुरुजींचे शिकवणे खूप आवडायचे;

नरेंद्रने दप्तरात एका पावडरची पुडी आणून ठेवली होती; त्याने मुद्दाम शेजारच्या मुलाच्या टिफीन बॉक्स मधील डबा बाहेर काढला; व मुद्दाम खाली पाडला. वर तुलाच बॅग नीट ठेवता येत नाही का? मी काही केले नाही; थोडासा धक्का लागला, म्हणून त्याच्याशीच मोठमोठ्याने भांडू लागला ... बाकीच्या वर्गात शांतता होती; सगळे आपापला स्वाध्याय सोडवित होते. नरेंद्रच्या वर्गातील कोलाहल स्टाफ रूमपर्यंत पोहचला; खरे गुरुजी हातातील काम सोडून काय झाले ते बघून येतो असे सांगून वर्गात गेले; नरेंद्रच्या धक्क्याने डबा सांडला असे कळल्यावर सगळ्या वर्गाला शांत राहण्यास सांगून; आम्ही महत्वाच्या कामात गुंतलेलो असल्यामुळे आता शांततेने आपापला अभ्यास करा. आणि त्या मुलाला जवळ घेवून सांगितले की; मला माहीत आहे तू खूप दूरवरुन खेड्यातून शाळेत येतो; तुझा डबा सांडला हे वाईट झाले; मी माझा डबा बाकुरावसोबत पाठवतो - पण तू उपाशी राहू नकोस. असे सांगत असतांनाच, गुरुजी तुमच्या शर्टवर काहीतरी कचरा पडला असे नरेंद्राने म्हणून हातातील कागदाने गुरुजींचा शर्ट झटकू लागला. काहीतरी पावडर उडाल्यासारखे त्यांना वाटले; पण घाईत असल्यामुळे ते लगेच मिटींग साठी स्टाफरुम मध्ये गेले.

एक एक मुद्दे संगतवार मांडून हलावेगळे होत होते. परीक्षेचा आराखडा, नियोजन तयार झाले.

AIT Global India Pvt. Ltd.
Aspire Intend Transform

सगळे शिक्षक आपापले काम नोंदवहीत लिहून घेत होते वरवरे गुरुजी मात्र अस्वस्थ होवून चुळबुळ करु लागले. काय झालं हे त्यांनाही कळेना. सगळ्या अंगावर मुंग्या (?) खाज सुटायला लागली. ते अक्षरशः वेड्यासारखे हातावर, पायावर, पाठीला, मानेजवळ खूप खाजवू लागले. शेवटी तर असह्य होवून लोळू लागले. कोणालाच कांही सुचेना; आतापर्यंत तर चांगले बोलत होते.

शेवटी बाबुराव शिपायाला संशय आला की ही खाजखुजलीची खाज असावी, त्याने मैदानात जावून काळी माती, शेजारच्या घरातील माठ्यातून शेण आणलं, त्याचा लगदा करून गुरुजींच्या अंगाला लावू लागला. गुरुजींना त्रास सहन होत नव्हता. हेडगुरुजी मग वर्ग ८ मध्ये गेले - काय झालं ते समजलं. नरेंद्रच्या उपद्रवी स्वभावाची कल्पना हेडगुरुजींना होतीच. त्यानेच शिताफीने ती पावडर वरवरे गुरुजींच्या अंगावर सदऱ्यावर टाकली असा त्यांना पक्का संशय आला. त्यांनी नरेंद्रला स्वतःच्या केबिनमध्ये बोलावले, साम दाम दंड भेदाने त्याच्याकडून खरं काय ते वदवून घेतलं.

नरेंद्रने सांगितले की, सगळ्या वर्गासमोर वरवरे गुरुजी त्याला रागवायचे; आणि ते त्याला अपमानास्पद वाटायचे. स्वतः अभ्यास कधी करायचा नाही हे त्याच्या लक्षातच येत नव्हते; कधीतरी वेळ आल्यावर आपण याचा बदला घेवू असं मनाशी ठरवून तो ती खाजखुईरीची पुडी खोवून ठेवू लागला; त्याच्या बाजूचा सचिन हा गरीब असून अभ्यासात हुशार होता; वरवरे गुरुजी त्याचे उदाहरण नरेंद्रला नेहमी देत असत; शिक्षणासाठी त्याला कीती कष्ट करावे लागतात. आणि तू - तुला सगळं वेळेवर उपलब्ध होतं असूनही अभ्यास का करत नाहीस ?? असं गुरुजी फेकायचे; त्यामागची

AIT Global India Pvt. Ltd.

त्याच मात व्हाव हिच भावना असायची हे कांही त्याला उमजत नव्हतं. आज गुरुजी अगदी त्याच्याजवळ उभे राहून मशीनची समजून काढत होते. ती संधी साधून त्यानेच पावडर गुरुजींच्या शर्टवर, मानेवर भुरकावली. आणि म्हणूनच खरे गुरुजींना त्रास होवु लागला.

आता सगळ्या स्टाफला काय घडलं हे कळलं. कुलकर्णी गुरुजींनी खरे गुरुजींना त्यांच्या घरी पोहचवून दिले. इकडे शाळेत सगळीकडे हीच चर्चा होती. तावडतोब नरेंद्रच्या वडिलांना पण ऑफीसमध्ये बोलावले. मागच्या महिन्यात नामजोशी सरांनाही वर्गातील खुर्चीचा पाय तोडून नुसताच जोडून ठेवला होता नरेंद्रने!! गुरुजी हजेरी घेण्यासाठी म्हणून खुर्चीवर बसायला गेले असतांना धाडकन खुर्चीसगट खाली पडले होते. अजूनही त्यांचा पाय प्लास्टरमध्ये होता. पायाचे हाड जुळले तर ठीक अन्यथा ऑपरेशन करावे लागेल, म्हणून सध्या ते रजेवर होते. आणि आजचा नरेंद्रचा हा प्रताप!! हेडगुरुजी नरेंद्रच्या वडीलांना म्हणाले, काय शिक्षा द्यायची तुमच्या मुलाला हे तुम्हीच आता सांगा, दुसऱ्याच्या जीवावर उठणारा- इतका बेताल कसा वागु शकतो तो? तुम्हाला कितीदा वॉर्निंग दिली होती पण त्याच्या वागण्यात काहीच सुधारणा नाही. कीती वेळा त्याला माफ करायचं? लहान-लहान म्हणून सोडून द्यावचं? पण आता बस झालं. आज त्याची T.C. घेवून जा. त्याला आता शाळेत प्रवेश नाही.

नरेंद्रचे वडील हतबल झाले. म्हणाले; गुरुजी असं नका करु, तो घरीही असाच बिथरल्यासारखं वागतो. आम्ही तर हात टेकले त्याच्यापुढे. पण मी हात जोडून विनंती करतो की त्याला शाळेतून काढु नका. मी माफी मागतो. त्याच्या भविष्याचा विचार करा हो; म्हणून गयावया करु लागले.

इकडे तोपर्यंत शाळेला सुट्टी झाली होती. खरंतर गुरुजींना खूप त्रास होतो हे सगळ्या विद्यार्थ्यांनाही कळले होते. प्रसंगाचे गांभीर्य त्यांच्या लक्षात आले. आणि सचिनला बरोबर घेऊन नरेंद्र गुरुजींच्या घरी आला. त्यांची होणारी तगमग पाहून त्याला स्वतःचीच लाज वाटू लागली. रडत रडत तो म्हणाला - मला फक्त तुम्हाला त्रास द्यायचा होता म्हणून मी हे दुष्कृत्य केलं - पण आता मला पश्चात्ताप होतो आहे - गुरुजी खरंच मला माफ करा. माझ्या हातून अक्षम्य गुन्हा झाला. यापुढे मी असं कधीही वागणार नाही - कुणालाच त्रास देणार नाही; हे गुरुजींनी मला रागावलं पण त्याच बरोबर मी जर असंच वागत राहिलो तर काय दुष्परिणाम होतील हे समजावूनही सांगितलं... त्याच्या गोष्टींबद्दल मी खरंच शरमिंदा आहे. आता तुम्हाला बरं वाटल्याशिवाय मी इथून जाणारच नाही...

गुरुजींच्या घरातील लोकांनाही त्याचा खूप राग आला होता - पण गुरुजींनी नरेंद्राला शांतपणे समजावून सांगितले - व यापुढे अभ्यास करेन - इकडेतिकडे लक्ष न देता चांगलं वागण्याचा प्रयत्न करीन असे आश्वासन घेऊन त्याला त्याच्या घरी पाठवले !!

घरी परतल्यावर नरेंद्राला जाणवले गुरुजींचं मन किती मोठं आहे - त्यांना जरी माझा राग आला तरी मला किती कळकळीने उदाहरणं देऊन माझं वागणं किती लाजिरवाणं आहे हे पटवून दिलं. दुसरं कोणी असतं तर पोलिस कंप्लेंट केली असती - मग माझं पुढील शिक्षण - करीअर कसं घडलं असतं ?? पण गुरुजींचं व्यक्तिमत्त्व खूपच महान आहे की - खरंच माझं मतपरिवर्तन झालं - आजवर घरी आई - बाबा पण किती प्रयत्न करीत होते - पण गुरुजी म्हणाले तेच बरोबर आहे - सगळं सुख आयतं मिळालं की त्याची किंमत नसते

AIT Global India Pvt. Ltd.

कष्टाची मीठ भाकर साचीन किती जपून आणि आवडीने खाती - आणि मी ?? खरच धिक्कार आहे माझा... मी पण आजपासून हट्ट करणार नाही; अभ्यास करेन, मोठ्यांचा आदर करेन !! गुरुजी तुम्हाला मी वचन देतो की; मी माझं म्हणणं खरं करुन दाखवीन !! असं मनोमन म्हणत तो आईबाबांची पण क्षमा मागायला त्यांच्याजवळ गेला... आई बिचारी सकाळपासून रडतच होती - नरेंद्रच तिला समजावून सांगु लागला - म्हणाला; अगं शिल्पकार जसा दगडातून मूर्ती घडवतो तसच गुरुजींनी पण, या तुझ्या पाषाणहृदयी मुलाच्या जीवनाला सुंदर आकार दिला. त्यांचा विश्वास मला सार्थ करायचा आहे. माझे प्रयत्न आणि तुमचा आशीर्वाद यांच्या बळावर मी नक्कीच प्रत्येक परीक्षेत यश मिळवून दाखवेन !!

आईने देवाजवळ दिवा लावला; व नरेंद्रची मनोकामना पुर्ण होवू दे म्हणून प्रार्थना करु लागली !! गुरुजींना उद्याच भेटायला जावु असं मनाशी म्हणत ती आपल्या कामाला लागली !!

आणि अर्थात नरेंद्रने गणितापासूनच अभ्यासाला सुरुवात केली; छीन्नीचे घाव सोसल्याशिवाय दगडालाही देवपण प्राप्त होत नाही - मग मी तर अज्ञान बालक !! आता फक्त एकच ध्येय खरंच गुरुजींना अभिमान वाटेल असंच वागणं !! नरेंद्रला एकदम हलक हलक वाटलं शांत मनाने तो अभ्यासाला लागला.

शब्दांकन :- सौ विजया जोशी.                श्री विष्णू रामचंद्र उपाध्ये



